# <u>प्रेसनोट</u>

दि. २२/०२/२०२४

## पोलीसांकडील अर्ज चौकशी प्रकरणात मध्यस्थी करणा-या खाजगी इसमावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १६०/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | तुषार शितल बनकर, वय ३० वर्ष, व्यवसाय - इंम्पोर्ट एक्सपोर्ट, रा. आंबेगाव पठार, पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- रुपये (एक लाख रुपये) |
| पडताळणी दिनांक | १३/०२/२०२४, २०/०२/२०२४. |
| सापळा दिनांक | २१/०२/२०२४ |

ठिकाण :- श्री. स्वामी समर्थ स्नॅक्स सेंटर, सुखसागर नगर चौकी समोर, सुखसागर नगर, कात्रज, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचेविरुद्ध भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन, सायबर युनिट येथे फसवणुकीचा ऑनलाईन तक्रार अर्ज दाखल होता. सदर अर्जामध्ये चौकशी अधिकारी पोलीस उप निरीक्षक संजय नरळे साहेबांना सांगून मदत करण्यासाठी व प्रकरण मिटविण्यासाठी खाजगी इसम तुषार बनकर ह्याने लोकसेवकाकरीता १,००,०००/- रुपयाची लाच मागणी केलेबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, खाजगी इसम तुषार बनकर याने लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक संजय नराळे ह्यांना सागुन मदत करतो व प्रकरण मिटवतो असे सांगून लोकसेवक संजय नराळे यांचेकरीता १,००,०००/-रु. (एक लाख रुपये) लाच रकमेची मागणी करुन ते पैसे टप्प्याटप्प्याने देण्यास सांगून दि. २१/०२/२०२४ रोजी लाचेचा पहिला हफ्ता म्हणुन २५,०००/- रुपये पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारली असता, खाजगी इसम तुषार बनकर यास अटक करण्यात आली असून, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.